Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# भारतीय अर्थव्यवस्थेवर आधारभुत संरचनेचा परिणाम

**प्रा. डॉ. एस. एस. गिरे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
आर.वाय.पी.कला महाविदयालय विहामाडवा
ता.पैठण जि.औरंगाबाद.

**प्रस्तावना** :

भारत हा कृषी प्रधान देश आहे. कोणत्याही देशाचा, राज्याचा विभागाचा विकास हा त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या आधारभुत संरचनेवर आधारित असतो. तसेच देशाचा विकास हा कृषी आणि उदयोगांच्या विकासावर अवलंबून असतो. परंतु कृषी उत्पादनासाठी संचालन शक्ती आणि दळणवळणांच्या सुविध्या इत्यादी बाबीची आवश्यकता असते. भारतामध्ये कुशल श्रमिकाकचा पुरवठा, वीज, पाणी, वित्तीय व विमा संस्था,व्यवस्थापन, वाहतुक व दळणवळणांच्या सोयी यांना अर्थव्यवस्थेच्या आधारभुत संरचना म्हणतात. आधारभुत संरचना प्रत्यक्षपणे वस्तूचे उत्पादन करत नाहीत, परंतु अर्थिक व्यवहाराची पातळी उंचावण्यासाठी परिस्थितीची अनुकूलता निर्माण करतात. मागील 200 वर्षामध्ये इंग्लंड व अन्य देशाची उदयोग आणि कृषि क्रांती बरोबरच दळणवळण आणि संचार क्षेत्रातही क्रांती घडवुन आणली आहे.

**आधारभूत संरचनेतील प्रमुख घटक** :

1) विज्ञान आणि तंत्रज्ञान

2) सामाजिक आधारभुत संरचना :- स्वास्थे, सार्वजानिक आरोग्य आणि शिक्षण

3) उर्जा :- कोळसा, वीज, खनिज तेल आणि अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत

4) वाहतूक :- रेल्वे, रस्ते, जल आणि हवाई वाहतूक

5) दळणवळण :- टपाल, तार, दुरध्वनी.

6) अधिकोषण :- वित्त आणि विमा सेवा

अर्थव्यवस्थेची संरचना बदलाण्यासाठी पायाभुत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे महत्त्वाचे आहे. निकृष्ट पायाभूत सुविधांमुळे अर्थिंक विकासात अडथळा निर्माण होतो. त्याचा परिणाम वीज, वाहतुक, दळणवळण, जलसिंचन, बँक, शिक्षण या महत्वाच्या बाबींवर होतो. महाराष्ट्रातील विविध विभागांचा समतोल विकास झालेला नाही. यात विशेषत: मराठावाडा व विदर्भ इतर विभागाच्या तुलनेने

मागसलेले आहेत. याचे सर्वात मोठे कारण या विभागांमध्ये पायाभूत सुविधांचा म्हणावा तेवढा विकास झालेला नाही.

**शोधनिबंधाची उदिष्टये** :

1. महाराष्ट्रातील मराठवाडा व विदर्भ या विभागाच्या मागसलेपणाची कारणे शोधणे.

2.महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांची सध्यस्थिती जणून घेणे.

सर्व साधारणपणे वरील उदिष्टये डोळयासमोर ठेऊन या विषयाची मांडणी केली जाईल, यात महाराष्ट्रातील मानव विकास निर्देशांक, साक्षरता, रेल्वे, रस्ते अधिकोषण, आरोग्य, पोष्ट व दुरध्वनी यांचा अभ्यास केला जाईल.

**संशोधन पध्दती** :

महाराष्ट्रातील पायाभुत सुविधांच्या संदर्भात आवश्यक असणारी सांख्यकिय माहिती महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2013,विविध जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, नियतकालीके या द्वितीयक स्त्रतामधुन गोळा केली जाईल. पायाभुत सुविधांमधील सांख्यकिय बदलाची प्रवृत्ती जाणुन घेण्यासाठी शेकडा गुणोत्तर या साधनाचा उपयोग केला जाईल.

**पायाभुत सुविधांचे महत्व** :

प्रत्येक राष्ट्राचा आर्थिक विकास हा त्या राष्ट्रातील कृषी, उदयोग व व्यापार यांच्या विकासावर अवलंबुन असतो. कृषी या घटकाच्या जलद आर्थिक विकासासाठी जलसिंचन, वीज, रस्ते, रेल्वे आदींचे गरज असते. या सुविधा जेवढया जास्त प्रमाणात उपलब्ध असतील तेवढा अर्थव्यवस्थेचा विकास होतो. म्हणुन पायाभुत सुविधांचे महत्व पुढील बाबींवरुन स्पष्ट करता येईल.

1. सामजिक व सांस्कृतिक प्रगत साध्य करता येते.

2. बाजारपेठांचा विस्तार होतो.

3. दारिद्रयात घट घडुन येते

4. पायाभूत सुविधांमुळे उत्पादन खर्च कमी होतो.

5.अर्थव्यवस्थेचे कार्य सुलभ होते.

6. कृषी क्षेत्राची प्रगती साध्य होते.

7. जलद व समतोल औदयागिक विकासासाठी

8.उत्पादन घटकांच्या गतीशितेत वाढ होते.

**नियोजनकाळातील भारतातील पायाभूत सुवियधांचा झालेला विकास** :

भारतात अर्थिक नियोजनाची सुरुवात 1951 पासुन सुरुवात झाली.अर्थिक नियोजनाच्या सुरुवातीपासूनच नियोजन कारना पायाभुत सुविधांचे महत्त्व ओळखुन त्यांच्या विकासाला अग्रक्रम दिला भारताने 1951 मध्ये पहिल्या योजनेत एकुण खर्चाच्या 55 ते 61 टक्के रक्कम पायाभूत सुविधांच्या विकासावर खर्च केली 2010 - 2011 चे अंदाजपत्रक सादर करताना तत्कालीन अर्थमंत्री श्री प्रणव मुखर्ज यानी देशाच्य विकासासाठी राज्यात बाबत पायाभुत सुविधा या महत्वाच्या आहेत असे म्हटले आहे. व त्यासाठी 2010 - 11 या आर्थिक वर्षात 1,73,552 कोटी रुपयाची तरतूद केली होती. यांचा परिणाम भारताचा विकासदर वाढला. यावरुन स्वातंत्र्य मिळाल्यापासुन ते आजतागायत भारतात पायाभुत सुविधांचा विकास फार मोठया प्रमाणवार घडुन आल्याचे दिसते. म्हणुन पायाभुत सुविधा आर्थिक विकासाची गती वाढविण्यासाठी मदत करतात. कुशल श्रमीकांचा पुरवठा, वीज, पाणी, बँक व विमा संस्था, व्यवस्थापन, वाहतूक, दळणवळणाच्या सोयी इ. ना अर्थव्यवथेत महत्त्वाचे स्थान असते.

**महाराष्ट्रातील पायाभुत सुविधांचा विकास** :

पायाभुत सुविधा या उत्पादन कार्यामध्ये महत्वाची भुमिका पार पाडतात. उर्जा. वाहतुक, जलसिंचन, अधिकोष, दळणवळण या भौतिक पायाभुत सुविधा व शिक्षण व आरोग्य या सामाजिक पायाभूत सुविधा आर्थिक विकासाला सहाय्यभुत ठरतात. महाराष्ट्रात या सुविधांचा विकास हा पुढील प्रमाणे झालेला दिसतो.

**महाराष्ट्रातील वीज वापर व सरासरी दरडोई उपभोग** :

मानवी जीवनाच्या प्रत्येक स्तरावर वीज ही बाब आवश्यक बनली आहे. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी व रोजगार निर्मितीसाठी तसेच आर्थिक क्षेत्रात मोठा वाटा असलेल्या सेवा क्षेत्रात सातत्यपुर्ण विकासासाठी वीज महत्तवाची असते. आज रोजी महाराष्ट्रात ग्रामीण भागात कृषी कार्यासाठी वीजेवर चालणा-या उपकरणांचा वापर मोठया प्रमाणावर वाढल्याचे दिसते. कारण ग्रामीण विद्गतीकरणाचा कार्यक्रम राबविल्यामुळे ग्रामीण भागातही दिवाबत्ती, पंखे, फ्रिज, दुरचित्रवाणी संच यांचा वापर वाढला आहे. तर नागरी भागात या वस्तूंबरोबरच एअर कंडीशनर व मायक्रो ओव्हन न या वस्तुंचा वापर वाढला आहे. यावरुन महाराष्ट्रातील लोकांच जीवनमान उंचावल्याचे दिसुन येते.

**क्षेत्रनिहाय वीज वापर तक्ता : (दशलक्ष युनिटस)**

| अ.क्र. | प्रकार /वर्षे | 1960-61 | 1970-71 | 1980-91 | 1900-91 | 2000-01 | 2010-11 | 2011-12 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | औदयोगिक | 1853 | 5312 | 8130 | 14706 | 18363 | 34416 | 36486 |
| 2 | घरगुती | 260 | 732 | 1779 | 5065 | 11172 | 19546 | 21041 |
| 3 | कृषी | 15 | 356 | 1723 | 6604 | 9940 | 16257 | 21693 |

**स्त्रोत** :- *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2010 - 11, 2011 - 12, 2012 - 13,महाराष्ट्रात 2011 - 12 मध्ये वरील घटकांशिवाय सार्वजनिक सेवा, रेल्वे व इतर मार्गानी मिळुन एकुण वीज वापर हा 96644 दशलक्ष युनिट इतका असू तो मागील वर्षापेक्षा 10.6 टक्कयांनी अधिक होता. या तिन्ही क्षेत्राचा एकत्रित वापर राज्यातील एकुण वीज वापराच्या 82 टक्के होता.*

**महाराष्ट्रातील रस्ते विकास** :

रस्ते विकास हा पायाभुत सुविधांमधील एक महत्वाचा घटक आहे. भारतीय रेल्वे हा भारतीय वाहतुक व्यवस्थेचा कणा असून देशांतर्गत परिवहनाचे मुख्य साधन आहे. संपुर्ण देशाच्या मार्च 2012 अखेर 65202 कि.मी. लोहमार्गाचे जाळे पसरलेले असून यांपैकी राज्यात लोहमार्गाची एकुण लांबी 5984 कि.मी. इतकी आहे. महाराष्ट्रात 31 मार्च 2012 पर्यंत 99 टक्क्यापेक्षा जास्त गावे ही बारमाही व हंगामी रस्त्यानी जोडलेली होती. राज्यातील एकूण 291 गावे असुनही कोणत्याही रस्त्यानी जोडलेली नाहीत. तसेच याच कालावधी अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्याची एकत्रित लांबी 2.43 लाख कि.मी. इतकी होती. तर रेल्वेमार्गाची लांबी 5983 कि.मी. इतकी होती. सन 2011 - 12 मध्ये राज्य महामार्गाची राष्ट्रीय महामार्गात श्रेणी वाढ इ ाालेली नाही. याच कालावधीत रस्त्याच्या लांबीत 1207 किलोमीटरने वाढ झाली. यापैकी राज्य महामार्गांची लांबीत 54 कि.मी. ने मुख्य जिल्हा रस्त्याच्या लांबीत 320 कि.मी. ने अन्य जिल्हा रस्त्याच्या लांबीत 632 कि.मी. ने वाढ झाली ने तर ग्रामीण रस्त्याच्या लांबीत 201 कि.मी. ने वाढ इ ााली. यातुन सक्षम वाहतुक यंत्रणा निर्माण होवुन दुर्गम, मागास व नागरी क्षेत्राना जोडुन जीवनमान उंचविण्याचे व उत्पादकता वाढविण्याची भुमिका पार पाडताना दिसते.

पक्क्या रस्त्यांमुळे कृषी क्षेत्रात निर्माण झालेल्या कच्चा माल, भाजीपाला व इतर साधने बाजारपेठेपर्यंत योग्य वेळेत नेता येतात. व कृषी आदाने बाजारातुन थेट शेताच्या बांधापर्यंत नेता येतात. यातुन प्राथिमिक व द्वितीय क्षेत्राचा विकास होवून आपोआपच सेवा क्षेत्र विकसित होण्यात मदत झालेली दिसते.

**महाराष्ट्रातील दळणवळण सुविधा** :

आधुनिका काळात माहिती व तंत्रज्ञान हे विकासकार्यांत महत्वाची भुमिका पार पाडतात. यामध्ये दुरध्वनी, भ्रमणध्वनी, इंटरनेट, ब्रॉडबँड सेवा यांचा समावेश होतो. राज्यात 2011 - 12 पर्यंत डाक कार्यालयांची एकुण संख्या 12600 इतकी होती यापैकी 11339 कार्यालये ही ग्रामीण भागात तर 1261 डाक कार्यालये ही नागरी भागात होती याचवेळेला टपाल पेटयांची संख्या ग्रामीण भागात 42012 तर नागरी भागात 8417 इतकी होती आणि पोष्टमन कार्यरत होते. यावरुन आजही ग्रामीण भागात टपालसेवा महत्वाची असल्याचे दिसुन येते.

राज्यात सप्टेंबर 2012 अखेर दुरध्वनी जोडण्यांची संख्या 55.62 लाख होती. तर दर लाख लोकसंख्येमागे भ्रमणध्वनी चालकांच संख्या 84414 होती. यात खाजगी क्षेत्राच्या सहभागाने मोठया प्रमाणात वाढ होत आहे.

**महाराष्ट्रातील शिक्षणाची सदया : स्थिती** :

सामाजिक विकास हा आर्थिक विकासाचा मार्ग सुकर करतो. सन 1960 - 61 ते 2011 या काळात राज्यात प्राथमिक शिक्षण संस्था 34594 वरुन 72053 इतक्या वाढलेल्या आहेत. तर विदयार्थी संख्या 4178रुन 100490 इतकी वाढली आहे. तर शिक्षक 113000 वरुन 346000 इतके वाढलेत. तसेच प्रत्येक शिक्षकामागे विदयार्थीसंख्या 37 वरुन 30 एवढी झाली तर शिक्षक संख्या 31200 एवढी झाली आहे. मात्र प्रत्येक शिक्षकामागे विदयार्थी संख्या वाढवुन 30 एवढी करण्यात आली.

राज्यामध्ये एकुण दहा बिगर कृषी विदयापीठ असून त्यामध्ये केवळ स्त्रियांसाठी असणारे एस.एन.डी.टी. विदयापीठ आहे. याशिवाय राज्यात मोठया प्रमाणावर उच्च शिक्षण व वैदयकिय शिक्षण देणा-या संस्था वाढलेल्या दिसतात. शिवाय राज्यात 21 अभिमत विदयापीठे आहेत. शिवाय राज्याने प्राथमिक शिक्षणास महत्व दिल्यामुळे साक्षरता दरामध्ये सातत्याने सुधारणा होताना दिसते आहे. जनगणना 2011 नुसार देशाच्या साक्षरता दर 74 टक्के होता तर महाराष्ट्र राज्याचा साक्षरता दर 82.9 टक्के होता. तर राज्याचा मानव विकास निर्देशांक 0.572 असून राज्याचा देशात पाचवा क्रमांक आहे.

**महाराष्ट्रतील अधिकारण सुविधा** :

वित्तीय संस्थांचे कार्यक्षम जाळे अर्थिक विकासास चालना देण्याचे काम करतात. या वित्तसंस्था अर्थव्यवस्थेतील पायाभुत सुविधाना कार्यक्षम करण्याचे काम करतात. महाराट्र हे भारतातील

औदयोगिकदृष्टया प्रगत राज्य आहे. मार्च 2012 अखेर भारतात एकूण बँक कार्यालयाच्या नऊ टक्के बँक कार्यालये ही राज्यात होती. राज्याच्या वित्तव्यवस्थेत व्यापारी बँकाचे स्थान महत्वाचे आहे.

सन 1969 नंतर व्यापारी बँकाचा शाखाविस्तार ग्रामीण भागापर्यंत पोहोचला आहे. हे खालील तक्त्यावरुन दिसून येते. महाराष्ट्रात व्यापारी बँकाच्या कार्यालयांची संख्या सन 1971 - 72 मध्ये 1471 इतकी होती तर मार्च 2012 आखेर यात वाट होऊन ही संख्या 9053 इतकी झालेली आहे. तर एकूण पतपुरवठा 1291.2 कोटी रुपये होता तो वाढुन 2011 - 12 या वर्षात 7,22,544 कोटी रुपयापर्यंत वाढलेला दिसतो. तसेच बँकांच एकुण ठेवी या 1971 - 72 साली 1460.60 कोटी रुपये इतक्या होत्या त्यात 2011 - 12 पर्यंत वाढ होऊन त 6,75,241 कोटी रुपये इतक्या झाल्या. याच कालावधीत दर एक लाख लोकसंख्येमागे बँक कार्यालयांची संख्या वाढुन ती 2.9 वरुन 8.5 पर्यंत गेलेली आहे. म्हणजेच राज्यात अधिकोष सुविधा वाढल्यामुळे शेती, व्यापार, उयोदग व सेवा क्षेत्राची भरभराट झ ालेली दिसते.

**तक्ता : महाराष्ट्रातील व्यापारी बँकांची प्रगती (आकडे कोटी रुपयात)**

| अ.क्र. | वर्षे | कार्यालयाची संख्या | एकुण पतपुरवठा | एकुण ठेवी | 1 लाख लोकसंख्ये मागे असलेल बँक कार्यालया ीच संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1971-72 | 1471 | 1291.20 | 1460.06 | 2.9 |
| 2 | 1981-82 | 3621 | 5930.72 | 7590.33 | 5.8 |
| 3 | 1991-92 | 5591 | 29646.85 | 40229.58 | 7.4 |
| 4 | 2001-12 | 8515 | 143506.59 | 117600.33 | 6.5 |
| 5. | 2011-12 | 8515 | 722544 | 675241 | 8.5 |

**स्त्रोत** : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2001 - 02, 2011 - 12, 2012 - 13 थोडक्यात देशाच्या कृषी व औदयोगिक विकासासाठी वाहतुक व पायाभुत सुविधा या पुरेशा व कार्यक्षम असाव्या लागतात व महराष्ट्र राज्यात या सर्व पायाभूत सुविधा मोठया प्रमाणावर विकसित झाल्यामुळे राज्याचा आर्थिक विकास मोठया प्रमाणावर घडुन आलेला दिसतो.

**निष्कर्ष व शिफारशी** :

भारतात महाराष्ट्र राज्याची स्थापना 1 मे 1960 रोजी झाली आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थपनेनंतर महाराष्ट्राने केंद्राच्या धर्तीवर आर्थिक नियोजन स्वीकारले व पायाभूत सुविधांचा मोठया प्रमाणावर विकास झालेला आहे परंतु या सुविधांच्या विकासात प्रामुख्याने काही त्रुटी आहेत जसे की राज्यात विद्वत प्रकल्प, रेल्वे, जलसिंचनाच्या सुविधा यांचा पुरेपुर वापर होत नाही तसेच पायाभुत

सुविधांचे केंद्रीकरण शहरातच झालेली आहे. वाहतुकीची साधने ही जुनाट व कालबाहय झालेली दिसतात. संशोधन हे फक्त सार्वजानिक क्षेत्रातच होते त्यामुळे त्यावर मर्यादा येतात. शिवाय महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात या सुविधा पोहचविण्यसाठी कार्यक्षम यंत्रणा नाही.

वरील त्रुटीवर मात करण्यासाठी कृषी प्रक्रिया उदयोगाना प्रोत्साहन देणे व त्यासाठी ग्रामीण भागत पायाभूत सुविधा वाढविण्यावर भर देण्यात यावा. तसेच वीज, वाहतुक, दळणवळण, रेल्वे, रस्ते व जलसिंचन या पायाभूत सुविधांचा पुरे पुर व कार्यक्षम वापर करणे यातुन राज्याच्या अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास घडुन येईल. अशा प्रकारे पायाभुत सुविधाचा विकास झाला तर देश विकासीत होण्यास फार काळ लागणार नाही. पायाभुत सुविधा म्हणजे मानवी शरीर सदृढ राहण्यासाठी रक्त वाहण्या जशा महत्वाच्या असतात तशा देशाच्या विकासासाठी पायाभुत सुविधा महत्तवाच्या असतात.

**संदर्भ** :

1. भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) डॉ. श्रीधर व विनायक देशपांडे
2. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी. महाराष्ट्र शासन
3. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था. डॉ. बी. डी. इंगळे अरुणा प्रकाशन, लातुर
4. वार्षिकी 2011, महाराष्ट्र संपादक. तुकाराम जाधव. द युनिक ॲकडमी, पुणे.
5. भारताचा वाणिज्य व अर्थिक भूगोल प्रा. श्री. भ. धूत. समर्थ प्रकाशन, औरंगाबाद
6. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था. डॉ. आर. एस. सोळुंके, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद
7. भारताचे अर्थिक प्रश्न श्री. डॉ. आ. देशपांडे. विदया प्रकाशन, नागपुर 2
8. अर्थविचार. संपादक डॉ. विलास सुकाळे
9. अर्थसंवाद. विविध अंक